**The Bishop's Co-Ed School, Undri.**

## मराठी दिवस वृत्तांत २०२२ – २०२३

दिनांक: ३० जानेवारी २०२३

"आनंदाचे डोही आनंद तरंग" या तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणे शाळेमध्ये सगळीकडे आनंद पसरला होता. आपल्या शाळेमध्ये आपण दरवर्षी मराठी दिवस साजरा करतो. मराठी दिवस साजरा करण्याची दशकपूर्ती झाली असून मराठी दिवस साजरा करण्याचे हे अकरावे वर्ष आहे.

२७ फेब्रुवारी हा दिवस मराठी कवी श्री. वि. वा. शिरवाडकर यांच्या जन्म दिनानिमित्त "मराठी दिवस" म्हणून साजरा केला जातो. हे कवी कुसुमाग्रज म्हणूनही ओळखले जातात. कुसुमाग्रज हे प्रख्यात कवी, नाटककार व लेखक होते. १९८७ मध्ये त्यांना ज्ञानपीठ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. तर पद्मभूषण हा सन्मान १९९१ साली त्यांना मिळाला होता. कार्यक्रमाच्या सुरवातीला सर्व वरिष्ठांचे ढोल लेझीम च्या तालावर स्वागत करण्यात आले. दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सर्व प्रथम परिपाठ घेण्यात आला. रोजच्या सर्व प्रार्थना मराठीत घेण्यात आल्या. परमेश्वराच्या आशीर्वादाने कार्यक्रमाचा आरंभ करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अवनी शेटे हिने केले.

आपल्या शाळेचे मुख्याध्यापक श्रीयुत राल्फ रसल, प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती फर्नांडिस, कनिष्ठ महाविद्यालयाच्या समन्वयिका श्रीमती बेग, वरिष्ठ विभागाच्या समन्वयिका श्रीमती कुरियन, माध्यमिक विभागाच्या समन्वयिका श्रीमती खंडेलवाल, यांनी मराठी दिवसाच्या कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली. तसेच आपले प्राचार्य श्री लूक सरां यांचे देखील वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले.

आपल्या शाळेमध्ये सर्वजण या दिवसाची उत्सुकतेने वाट पहात असतात. या कार्यक्रमामध्ये

अंदाजे शंभर विद्यार्थ्यांचा समावेश होता. इयत्ता ६ वी ७ वी आणि ८ वी या वर्गातील विध्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाले होते. सर्व विदयार्थी नटून थटून आपापल्या नृत्याप्रमाणे पोषाख करून आले होते.

मानस अडसूळ याने मराठीचे महत्व सांगितले. स्त्रीच्या विविध व्यक्तिमत्वाचे पैलू एका शास्त्रीय नृत्यातून सादर करण्यात आले. "प्रकाशातले तारे तुम्ही अंधारावर रुसा हसा मुलांनो हसा", हे मुलांसाठी असलेले बालगीत मुलांनी समहूगीत म्हणून सादर केले. "मन उधाण वाऱ्याचे" व "मन शुद्ध तुझं गोष्ट हाय पृथ्वी मोलाची, तू चाल पुढं तुला र गड्या भीती कुणाची" ही दोन गाणी एकत्रितपणे नृत्यातुन सादर करण्यात आली.

कोणत्याही गोष्टीचा अतिरेक धोकादायक कसा असतो, हे "अति तिथे माती" या नाटकाद्वारे सूचित करण्यात आले. सर्व मुलांनी आपापल्या भूमिकेला योग्य न्याय दिला. छत्रपती शिवाजी महाराज हे किती थोर होते हे आपल्या सगळ्यांना माहित आहे, त्यांची महती सांगणाऱ्या एका गीताने करमणुकीच्या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सान्वी पाटील हिने सर्वांचे आभार मानले.

शाळेतील प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आनंद लुटला.

## कार्यक्रमाची काही क्षणचित्रं




दिपप्रज्वलन




स्वागत







मराठी राजभाषा दिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!



















वृत्तान्त लेखन

सौ. सायली कात्रे. (मराठी शिक्षिका)

